# पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक-पीन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७०० E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in


---

**प्रेस नोट** दिनांक :- २५/०१/२०२४

## महिरावणी मधील खूनाचा गुन्हा उघड
## सन २०२३ मधील खूनाचे सर्व (७६) गुन्हे उघडकीस आणण्यात ग्रामीण पोलीसांना यश

---

दिनांक २६/१२/२०२३ रोजी त्रंबकेश्वर पोलीस ठाणे हद्दीत नाशिक बाजूकडे जाणा-या रोडवर महिरावणी गावचे शिवारात रस्त्यालगत एका ३० ते ३५ वर्षीय तरूणाचा मृतदेह संशयास्पदरित्या आढळून आला होता. सदर बाबत त्रंबकेश्वर पोलीस ठाणेस अकस्मात मृत्यू दाखल करुन मयताची ओळख पटविण्यात आली, यातील मयत हा लक्ष्मण शंकर जाधव, वय ३२, रा. फुलेनगर, पंचवटी, नाशिक असल्याचे तपासात निष्पन्न झाले. मयतास कोणीतरी आरोपीने अज्ञात कारणासाठी धारदार व टोकदार हत्याराने छातीवर, मांडीवर समोरील व मागील बाजूस तसेच पोटावर गंभीर जखमा करुन जीवे ठार मारलेबाबत **त्रंबकेश्वर पोलीस ठाणे** येथे गुरनं ३३१/२०२३ भादवि कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सन २०२३ मध्ये नाशिक ग्रामीण जिल्हयात खूनाचे एकूण ७६ गुन्हे नोंद झाले. त्यापैकी ७५ गुन्हे उघडकीस आणण्यात ग्रामीण पोलीसांना यश आले होते. त्रंबकेश्वर येथील वरील खूनाचा गुन्हा उघडकीस आणणेसाठी पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप व अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सुनिल भामरे व त्रंबकेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. बिपीन शेवाळे यांनी घटनास्थळी धाव घेवून घटनास्थळाची पाहणी केली. यातील मयत इसम लक्ष्मण शंकर जाधव याचेबाबत सविस्तर माहीती घेतली असता, तो नाशिक शहरातील रहिवासी असून गेल्या काही दिवसांपासून त्रंबकेश्वर येथील त्याचे नातेवाईकांकडे रहावायास होता व घटनेच्या दिवशी तो रात्री ०८:०० वाजता चे सुमारास घरातून बाहेर पडला असल्याची माहिती प्राप्त झाली.

यातील मयत हा अत्यंत सर्वसाधारण कुटूंबातील असून सध्यास्थितीत तो कोणतेही काम करत नसल्याची माहिती त्याचे नातेवाईकांकडून मिळाली, तसेच त्यास दारू पिण्याचे व्यसनदेखील असल्याचे तपासात समोर आले. त्यावरुन तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी त्रंबकेश्वरमधून नाशिक बाजूकडे जाणारे रोडवरील सी.सी. टी.व्ही. कॅमे-यांची पडताळणी केली. त्यात मयत इसम हा रात्रौ १२:०० वाजेचे सुमारास नाशिक शहराकडे जाणारे रस्त्याने एकटाच पायी जातांना दिसून आला. त्याप्रमाणे नाशिक ते त्रंबकेश्वर रोडवरील हॉटेल, ढाबे, लॉजेस तसेच चहा- नाश्त्याची ठिकाणे तपास पथकातील पोलीसांनी चेक केली असता, उपलब्ध माहितीचे आधारे महिरावणी शिवारातील साईप्लाझा हॉटेल व लॉज येथून संशयीत नामे **निलेश सुरेश नांदे, वय २४, रा. धामनशेत, ता. मोखाडा, जि. पालघर, ह.मु. साईप्लाझा हॉटेल व लॉज** यास ताब्यात घेण्यात आले. सदर इसम हा हॉटेलमध्ये वेटर तसेच त्रंबकरोडवरील येणा-या/जाणा-या वाहनांमधील प्रवाशांना जेवणासाठी थांबविण्यासाठी वॉचमन म्हणून काम करत होता. त्यास वरील खूनाचे गुन्हयाचे तपासात विश्वासात घेवून कसून चौकशी केली असता, दिनांक २६/१२/२०२३ रोजी मध्यरात्रीचे सुमारास यातील मयत लक्ष्मण शंकर जाधव हा त्रंबकरोडने नाशिक बाजूकडे एकटाच पायी येत होता, त्यास संशयीत निलेश याने थांबवून हटकले असता, मयताने त्याला शिवीगाळ केली व त्यात दोघांमध्ये झटापट झाली. झटापटीमध्ये संशयीत निलेशने मयत लक्ष्मण याचे पोटावर, छातीवर तसेच मांडीवर चाकूने गंभीर वार करुन जीवे ठार मारले व कोणाचे निदर्शनास येवू नये म्हणून मृतदेह हा हॉटेलपासून दूर अंतरावर महिरावणी शिवारात रस्त्याचे लगत टाकून दिल्याबाबत कबूली दिली आहे. यातील आरोपीस वरील गुन्हयात अटक करण्यात आली असून पुढील तपास त्रंबकेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. बिपीन शेवाळे हे करीत आहेत.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप, अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. आदित्य मिरखेलकर यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे त्रंबकेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. बिपीन शेवाळे, पोउनि प्रभाकर पवार, सपोउनि अशोक बोडके, पोहवा शांताराम निंबेकर, जीवन जाधव, पोकॉ श्रावण साळवे, भारत भावले तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि श्री. सागर कोते, पोउनि दत्ता कांभीरे, सपोउनि शिवाजी ठोंबरे, पोहवा नवनाथ सानप, शांताराम घुगे, सुधाकर बागुल, सागर काकड, विश्वनाथ काकड यांनी वरील खूनाचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

सन २०२३ मध्ये नाशिक ग्रामीण घटकात एकूण ७६ खूनाचे गुन्हे नोंद झाले होते. यातील त्रंबकेश्वर पो.स्टे. येथे दाखल असलेला उपरोक्त गुन्हा हा उघडकीस आलेला नव्हता. मात्र, सदर गुन्हा हा आल्याने नाशिक ग्रामीण हद्दीत सन २०२३ मध्ये दाखल झालेल्या सर्व (७६) गुन्हयांची उकल करण्यात ग्रामीण पोलीसांना यश